**आकाशवाणी नागपूर,**

**प्रादेशिक बातम्या (मराठी-वेळ सायंकाळी ०६.००)**

**रविवार दिनांक ३१ ऑगस्ट २०२५**

**ठळक बातम्या**

1. **आत्मनिर्भरता आणि 'वोकल फॉर लोकल' हा मंत्र घेऊन देशानं पुढे जायला हवं, असं पंतप्रधानांच 'मन की बात' मधे प्रतिपादन.**
2. **शांघाय सहकार्य संघटनेच्या शिखर बैठकीच्या पार्श्वभूमीवर पंतप्रधानांची चीनच्या अध्यक्षांबरोबर चर्चा.**
3. **विदर्भात आज गौराईच  उत्साहात आगमन.**
4. **वर्धा जिल्ह्यातील भौगोलिक मानांकन प्राप्त, वायगाव हळदीची विदेशातही मागणी.**

मन की बात

आत्मनिर्भरता आणि वोकल फॉर लोकल हा मंत्र घेऊन देशानं पुढे जायला हवं, असं प्रतिपादन पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी केलं. 'मन की बात' या कार्यक्रमाच्या १२५ व्या भागात त्यांनी आकाशवाणीद्वारे आज देशवासियांना संबोधित केलं. आगामी सणासुदीच्या दिवसात स्वदेशीचा मंत्र विसरू नका, पेहराव, सजावट, उपाहार या सर्व गोष्टी स्वदेशी असाव्यात, असं आग्रही प्रतिपादन पंतप्रधानांनी केलं. तसंच उत्सवाच्या काळात स्वच्छता पाळण्याचा सल्ला दिला........

***आने वाले दिनों में बहुत सारे त्योहारों की रौनक होगी। इन त्योहारों में आपको स्वदेशी की बात कभी भी भूलनी नहीं है। उपहार वही जो भारत में बना हो, पहनावा वही जो भारत में बुना हो, सजावट वही जो भारत में बने, सामान से हो एक ही मंत्र वोकल फॉर लोकल।***

यूपीएससी परीक्षेत अपयश येणाऱ्या विद्यार्थ्यांना इतर परीक्षांसाठी तयारी करता यावी यासाठी 'प्रतिभा सेतू' हे डिजिटल व्यासपीठ तयार केल्याचं पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी सांगितलं. या पोर्टलमधे अभियंता, वैद्यकीय क्षेत्रात प्रवेश मिळवू बघणाऱ्या पण अपयश आलेल्या विद्यार्थ्यांची माहितीही आहे. या पोर्टलद्वारे माहिती घेऊन खासगी कंपन्या या विद्यार्थ्यांना नोकरी देणार  आहेत. याचा लाभ अनेक विद्यार्थ्यांना झाल्याचं  पंतप्रधानांनी नमूद केलं.......

***इस पोर्टल पर 10 हजार से ज्यादा ऐसे होनहार युवाओं का डेटा बैंक मौजूद है। कोई सिविल सर्विस की तैयारी कर रहा था, कोई इंजीनियरिंग सर्विस में जाना चाहता था, कोई मेडिकल सर्विसेज के हर पड़ाव को पार कर चुका था, लेकिन फाइनल में उसका सलेक्शन नहीं हुआ।ऐसे सभी उम्मीदवारों की जानकारी अब***

***प्रतिभा सेतु पोर्टल पर उपलब्ध कराई जा रही है। इस पोर्टल से प्राइवेट कंपनियां इन होनहार स्टूडेंट्स की जानकारी लेकर उन्हें अपने यहाँ नियुक्ति दे सकती हैं।***

जम्मू काश्मीरमधल्या दाल सरोवरात नुकत्याच झालेल्या खेलो इंडिया जलक्रीडा महोत्सवाचा पंतप्रधानांनी आपल्या संबोधनात विशेष उल्लेख केला. या स्पर्धेतले सुवर्णपदक विजेते खेळाडू ओदिशा इथली रश्मिता साहू आणि श्रीनगरमधला मोहसीन अली यांच्याशी पंतप्रधानांनी संवाद साधला आणि त्यांचं अभिनंदन केलं. 'एक भारत - श्रेष्ठ भारत' ही भावना देशाच्या एकात्मतेसाठी आवश्यक असून खेळ यात महत्त्वाची भूमिका बजावतात असं पंतप्रधान म्हणाले. देशातल्या सौरऊर्जा प्रकल्पांच्या प्रयोगाबद्दल पंतप्रधानांनि माहिती दिली. सौरऊर्जेच्या वापरामुळे शेतकऱ्यांचं जीवनमान बदलत असून त्याला त्याच्या मेहनतीचं फळ कैकपटीन जास्त मिळत असल्याचं पंतप्रधान म्हणाले. मागच्या काही दिवसात देशभरात अतिवृष्टी आणि इतर नैसर्गिक आपत्तीमुळे झालेल्या जीवितहानी आणि वित्तहानीबद्दल पंतप्रधानांनी दु:ख व्यक्त केलं. तसंच या काळात एनडीआरएफ, एसडीआरएफ, डॉक्टर आणि मदत करणाऱ्या सर्व नागरिकांचं कौतुक केलं. १५ सप्टेंबरला साजरा केल्या जाणाऱ्या महान अभियंता 'मोक्षगुंडम विश्वेश्वरैय्या' यांच्या जयंतीनिमित्त तसंच १७ सप्टेंबरला साजऱ्या केल्या जाणाऱ्या विश्वकर्मा जयंतीच्या मोदी यांनी सर्वांना शुभेच्छा दिल्या. सोनार, लोहार, सुतार, मूर्तीकार यानी देशाच्या प्रगतीचा पाया घातला आहे, असं ते म्हणाले. भारतीय संस्कृतीचा प्रभाव परदेशातल्या छोट्या छोट्या शहरातही दिसून येतो असं पंतप्रधान म्हणाले. यावेळी पंतप्रधानांनीं महर्षी वाल्मिकी यांच्या मूर्तीची स्थापना करणाऱ्या इटलीमधल्या कॅंपरोतोंदो या शहराचं उदाहरण दिलं. कॅनडात मिसीसागा इथल्या प्रभू श्रीरामाच्या ५१ फुटी मूर्तीचा उल्लेखही त्यांनी केला. तसंच रशियामधल्या व्लादिवोस्तोक इथं शाळकरी मुलांनी रामायणातल्या कथांवर आधारित चित्रांचं प्रदर्शन भरवल्याचं सांगत भारतीय संस्कृतीचा प्रसार जगाच्या कानाकोपऱ्यात होत असल्याबद्दल आनंद व्यक्त केला.

चीन अध्यक्ष भेट

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी आज चीनचे अध्यक्ष क्षी जिनपिंग यांच्याबरोबर द्विपक्षीय चर्चा केली. चीनमधे तियानजिन इथं झालेल्या बैठकीत केलेल्या चर्चेची ध्वनिफीत पंतप्रधानांनी समाज माध्यमावर दिली आहे. गेल्या वर्षी कजान इथं जिनपिंग यांच्याबरोबर झालेल्या चर्चेनंतर भारत- चीन संबंधांना सकारात्मक दिशा मिळाल्याचं त्यांनी म्हटलं आहे.सरहद्दीवरुन दोन्ही देशांचं सैन्य मागे हटल्यानंतर वातावरण शांत आहे. कैलास मानसरोवर यात्रा पुन्हा सुरु झाली असून दोन्ही देशांदरम्यान थेट हवाई सेवाही लवकरच सुरु होईल, अशी माहिती पंतप्रधानांनी दिली......

***सीमापर डीसऐंगेजमेंट के बाद शांति और स्थिरता का माहौल बना। हमारे स्पेशल रिप्रेझेंटेटिव्हस के बीच ऑर्डर मैनेजमेंट के संबंध में सहमति बनी। कैलाश मानसरोवर यात्रा फिर से शुरू हुई। दोनों देशों के बीच डायरेक्ट फ्लाइट फिर से शुरू की जा रही है। हमारे सहयोग से दोनों देशों के २.८ बिलियन लोगों के हित जुड़े हुए हैं। इससे पूरी मानवता के कल्याण का मार्ग भी प्रशस्त होगा।***

शांघाय सहकार्य संघटनेच्या शिखर बैठकीसाठी पंतप्रधान चीनच्या दौऱ्यावर आहेत. या बैठकीकरता तियानजिन मधे आलेल्या इतर राष्ट्रप्रमुखांबरोबरही ते द्विपक्षीय बैठका घेणार आहेत. त्यात रशियाचे अध्यक्ष व्लादिमीर पुतीन यांचा समावेश आहे. दरम्यान पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि चीनचे अध्यक्ष शी जिनपिंग यांनी आज पुन्हा स्पष्ट केलं की दोन्ही देश प्रतिस्पर्धी नसून विकास भागीदार आहेत. पंतप्रधानांनी चीनच्या कम्युनिस्ट पक्षाच्या पॉलिटब्युरोच्या स्थायी समितीचे सदस्य काय ची यांच्याशीही भेट घेतली.

मराठा आंदोलन

राज्य सरकारनं अद्याप, मागण्या मान्य न केल्यानं उद्यापासून उपोषण तीव्र करण्याची घोषणा मराठा आरक्षण आंदोलक मनोज जरांगे पाटील यांनी आज केली. उद्यापासून पाणीदेखील पिणार नसल्याचं त्यांनी मुंबईच्या आझाद मैदानावर वार्ताहरांना सांगितलं. ओबीसी प्रवर्गात मराठा आरक्षणाच्या मागणीसाठी मुंबईच्या आझाद मैदानात जरांगे यांनी सुरु केलेल्या उपोषणाचा आजचा तिसरा दिवस आहे. डॉक्टरांच्या पथकान आज त्यांची प्रकृती तपासली आणि त्यांच्या रक्तदाब आणि मधुमेह चाचण्या सुरळीत असल्याचा निर्वाळा दिला. समर्थकांनी शांतपणे आंदोलन करावं, ठरवून दिलेल्या ठिकाणी गाड्या उभ्या करुन उपनगरी रेल्वेन आझाद मैदानावर यावं, असं जरांगे यांनी सांगितलं. आंदोलकांची सोय करण्याच्या नावाखाली कोणीही पैसे मागू नयेत, असा इशाराही त्यांनी दिला. आरक्षण घेतल्याशिवाय मुंबई सोडणार नाही असं त्यांनी सांगितलं. दरम्यान, जरांगे यांनी केलेल्या मागण्यांसंदर्भात आज संध्याकाळी महाधिवक्त्यांशी चर्चा करणार असल्याची माहिती उपसमितीचे अध्यक्ष राधाकृष्ण विखे पाटील यांनी दिली.

गौराई पुजन

बाप्पाचे आगमन झाल्यानंतर जे आगमन होते ते गौराईचे. नागपूरात देखिल आज उत्साह आणि भक्तिमय वातावरणात जेष्ठ गौराईचे आगमन झालेले आहे. गौरी म्हणजेच महालक्ष्मीचं विदर्भात घरोघरी पुजन केलं जातं. अडीच दिवसाच्या माहेर वासीनी म्हणून यांचे आगमन होत असते. आगमन होत असतांना गौराईला नवीन वस्त्र, आणि अलंकारांनी सजविल्या जाते. पूजा, आरती केली जाते. उद्या ज्येष्ठा

गौरी पूजन होणार असून 2 सप्टेंबर रोजी ज्येष्ठ गौरीचं विसर्जन होईल. यानिमित्तान स्नेहभोजनासाठी एकमेकांच्या घरी आमंत्रित करण्याचा पायंडा असतो.

हळद उत्पादन

वर्धा जिल्हयातील परंपरागत पद्धतीन जपलेलं वाण म्हणजे वायगाव हळद. या भौगोलिक मानांकन प्राप्त वायगाव हळदीमध्ये, कर्क्युमिन या औषधी गुणधर्माचे प्रमाण सहा टक्क्यांपेक्षा जास्त आहे. देशासोबतच विदेशातही या हळदीला जास्त मागणी आहे.वर्धा जिल्हयात 500 हेक्टरवर हळदीची लागवड होते. याबद्दल अधिक माहिती देत आहेत हळद उत्पादक शेतकरी मीनाक्षी चांभारे......

***माझे नाव मीनाक्षी बालाजी चांबारे आहे. माझ्या गावाचे नाव वायगाव हळदया आहे. आमची हळद पारंपारिक हळद आहे. आमची हळद पहिली थोडीफार होती आता आमच्या गावात पारंपारिक पद्धतीपेक्षा सेंद्रिय खताने आणि जास्तीत जास्त उत्पन्न आमच्या गावामध्ये हळदीची आहे.***

वायगाव परिसरातील महिला बचत गटाला कंपनी स्थापनेसाठी शासनाच्या ग्रामविकास विभागाद्वारे मदत करण्यात आली असून राष्ट्रीय कृषी आणि ग्रामीण विकास बँक आणि कृषी विभागाच्या सहाय्यान ही हळद विदेशामध्ये निर्यात केली जात आहे.

हवामान

हवामान! येत्या काही तासांत विदर्भातील अकोला, अमरावती, वर्धा, नागपूर, यवतमाळ, चंद्रपूर आणि गडचिरोली जिल्हयांमध्ये काही ठिकाणी हलक्या ते मध्यम स्वरूपाचा पाऊस पडण्याची शक्यता हवामान विभागान वर्तवली आहे.

*****